# आजपासून सातपूरला गोदावरी महोत्सव

**सातपूर | प्रतिनिधी**

विश्व हिंदू सेनेच्या वतीने दि. २ ते १० मार्चदरम्यान गोदावरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये कला, क्रीडा, सांस्कृतिक व शैक्षणिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून रविवारी (दि. २) जलतरण स्पर्धेने महोत्सवाची सुरुवात करण्यात असल्याची माहिती विश्व हिंदू सेनेचे संस्थापक ॲड. महेंद्र शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. महोत्सवाचे उद्घाटन आ. सीमा हिरे यांच्या हस्ते करण्यात येणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भीमराव कडलग तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रशांत जाधव, लक्ष्मण सावजी उपस्थित असणार आहे. सातपूर परिसरातील सद्गुरुनगर, गणेशनगर, जलतरण तलाव, सातपूर कॉलनी याभागांमध्ये सामाजिक, राजकीय, सहकार, विधी, शिक्षण, उद्योग, कृषी, साहित्य, कला, क्रीडा, आरोग्य, अध्यात्म, पत्रकार, आदर्श ग्रामपंचायतीना महाराष्ट्र गोदावरी रत्न पुरस्काराने गौरविण्यात येणार आहेत. महोत्सवाची सांगता महाराष्ट्र गोदावरीरत्न पुरस्काराने तसेच पंचवटी येथे गोदावरी माता पूजन, महाआरती व महायज्ञाने होणार आहे.

गोदावरी स्पोर्टस मॅनिया, गोदावरी महोत्सवात क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल, चेस, खो-खो, कबड्डी, कराटे, ज्युडो, रंनिग, किडस मॅरेथॉन, साईक्लीन, डान्स कॉम्पिटिशिन, वेट लिफ्टिंग, बॉडी बिल्डींग, हस्तकला, चित्रकला, मिस्टर व मिस गोदावरी, सिंगिंग कॉम्पिटिशन, कवी संमेलनाचेही आयोजन करण्यात आले आहे.

### महोत्सवात प्रदर्शनीय दालने

छत्रपती शिवाजी महाराज सचित्र दालन, अज्ञानपत्राचे प्रदर्शन, शस्त्रास्त्र व गड किल्ल्याच्या छायाचित्रांचे प्रदर्शन, वस्त्र संस्कृती, खाद्य संस्कृती, हस्तकला दालन, बचत गटाचे उत्पादन दालन, पर्यटन विषयक दालन असणार आहे.

# नाशिकमार्गे मालेगावात एमडीचा पुरवठा

## तस्करी, विक्री करणारे दाम्पत्य गजाआड; पाच गुन्ह्यांत आठ महिलांचा सहभाग

**नाशिक | प्रतिनिधी**

नाशिक शहरात एमडी ड्रग्ज तस्करी व विक्रीच्या एकूण साखळीत पुन्हा एकदा दाम्पत्याचा सहभाग समोर आला आहे. मालेगावात वास्तव्य करणाऱ्या या दाम्पत्याने मुंबईतील मीरारोड येथून एमडी खरेदी करुन त्याची नाशिकमार्गे मालेगावात विक्री केल्याचा प्रयत्न केल्याचे नाशिक शहर अमली पदार्थ विरोधी पथकाच्या कारवाईतून समोर आले आहे. अब्दुल समद सिराज अहमद अन्सारी उर्फ बाबु(वय ४५) व त्याची पत्नी शबाना अब्दुल समद अन्सारी (वय-४० रा. दोघे रा. कमालपुरा, आखाडा मस्जिदीजवळ, मालेगाव) असे संशयित दाम्पत्याचे नाव आहे. मागील काही महिन्यांत करण्यात आलेल्या एमडी प्रतिबंधाच्या पाच घटनांत ड्रग्ज पेडलिंगचे काम आठ महिला करत असल्याचे यानिमित्ताने समोर आले आहे.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी एनडीपीएस पथकास अमली पदार्थविरोधी कारवा वाढवून पेडलरला पकडण्याचे आदेश दिले आहेत.

पथक त्यानुसार संशयितांचा माग काढत असतानाच, अमली पदार्थ विरोधी पथकाच्या(एनडीपीएस) वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुशीला कोल्हे यांना नाशिकरोड रेल्वेस्टेशन बाहेर वरील दाम्पत्य एमडीची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती शनिवारी(दि. १) मिळाली. त्यानुसार त्यांनी गुन्हेशाखेचे पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव, सहायक आयुक्त संदीप मिटके यांच्या सूचनेने पथक तयार केले. यानंतर, एनडीपीएस पथकातील सहायक निरीक्षक सचिन चौधरी, विशाल पाटील, सहायक उपनिरीक्षक रंजन बेंडाळे, संजय ताजणे, देवकिसन गायकर आदींनी सकाळी आठ वाजता सापळा रचून रेल्वेस्टेशनबाहेर संशयास्पदरित्या उभ्या असलेल्या अब्दुल उर्फ बाबू आणि शबानाला ताब्यात घेतले. त्यांच्या झडतीत अब्दुलकडे तीन लाख सात हजार ५०० रुपयांचे ६१.५ ग्रॅम तर, शबानाकडे ५२ हजार ५०० रुपयांचे १०.५ ग्रॅम मॅफेड्रॉन व २० हजारांची अन्य सामग्री असा एकूण तीन लाख ८० हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. संशयितांविरोधात नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### ड्रग्ज डिलिंगमध्ये महिलाराज

नाशकात मॅफेड्रॉन (एमडी) तस्करीच्या गुन्ह्यात 'छोटी भाभी', हिना शेख, ड्रग्जडिलर ललित पानपाटीलची मैत्रिण प्रज्ञा व अर्चना पाठोपाठ ऋतुजा भास्कर झिंगाडे, स्विटी सचिन अहिरे, पल्लवी निकुंभ उर्फ सोनाली शिंदे यांना ताब्यात घेण्यात आले होते. त्यानंतर, आता मालेगावातून नाशकात एमडी तस्करी करणाऱ्या शबाना अन्सारीचा सहभाग उघड झाला आहे. शहरात एमडी ड्रग्जच्या विक्री, तस्करीसह आधीन गेलेल्या नव्या पेडलरांची साखळी उघड होतानाच त्यातील एक महिला इंदोर व्हाया नाशकात एमडी ड्रग्जची डिल करत असल्याचे समोर आले होते. नाशिकमध्ये आतापर्यंत झालेल्या एमडीच्या पाच कारवायांत आठ महिलाचा सहभाग उघड झाल्याने तो चिंतेचा विषय ठरतो आहे.

# दहावीच्या विद्यार्थिनीची आत्महत्या

**नाशिक |** लहवित येथील पंचशिल नगरात राहणाऱ्या सोळा वर्षीय दिव्या दीपक भवार या दहावीच्या विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येचे नेमके कारण निष्पन्न झालेले नाही. दिव्या हिने नुकताच दहावीच्या परीक्षेचा पहिला पेपर दिला होता. त्यानंतर ती तणावात होती. त्यातच तिने दुसऱ्या पेपरचा अभ्यास सुरु केला असतानाच, शुक्रवारी(दि. २७) रात्री साडेअकरा वाजेपूर्वी घरात असतांना गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना लक्षात येताच तिची काकू धनश्री दिलीप भवार यांनी नातलगांच्या मदतीने तिला देवळाली कॅम्पातील कॅन्टोन्मेंट रुग्णालयात दाखल केले असता डॉ. धीरज कटारे यांनी तपासून मृत घोषित केले. घटनेची माहिती कळताच देवळाली कॅम्प पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय पिसे, हवालदार राजेंद्र गुंजाळ दाखल झाले. त्यांनी अधिक माहिती जाणून घेतली. दिव्या ही अभ्यासात पूर्वीपासून हुशार होती. असे असताना तिने नेमके अभ्यासाच्या किंवा लेखी पेपरच्या तणावातून आणि अन्य कारणातून टोकाचे हे पाऊल उचलल्याचा तपास पोलिसांनी सुरु केला आहे. मृत दिव्याच्या पश्चात आई, वडील, भाऊ व बहीण असा परिवार असून तिचे वडील मुंबईत खासगी सुरक्षा कंपनीत कार्यरत आहेत. या घटनेने लहवित भागात हळहळ व्यक्त केली जात असून देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तपास हवालदार गुंजाळ करत आहेत.

# मंत्री कोकाटेंच्या शिक्षा स्थगितीचा निर्णय ५ मार्चला

**नाशिक | प्रतिनिधी**

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू विजय कोकाटे यांच्या दोन वर्षांच्या शिक्षेला स्थगिती देण्याबाबत राखून ठेवलेल्या निकालाची सुनावणी होण्याआधीच मंत्री कोकाटे यांच्या शिक्षेच्या स्थगितीला आव्हान देणारे दोन हरकत अर्ज शनिवारी (दि.१) दाखल करण्यात आले. त्यामुळे प्रकरणात नवा ट्विस्ट निर्माण झाला. दरम्यान, हे हरकत अर्ज निकाली काढत न्यायालयाने शिक्षा स्थगितीच्या निर्णयावर येत्या पाच मार्च रोजी सुनावणी घेणार असल्याचे सांगितले. त्यामुळे मंत्री कोकाटे यांच्या मंत्रिपदासह आमदारकीवर टांगती तलवार कायम आहे.

बनावट दस्ताऐवज सादर करीत शासन कोटचातून सदनिका लाटल्याप्रकरणी मंत्री कोकाटे व त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांना गेल्या २० फेब्रुवारी रोजी दोन वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. १९९५ ते ९७ या काळातील हा अपहार होता. दरम्यान, या निर्णयाला मंत्री कोकाटे यांनी आव्हान देत शिक्षा स्थगितीसाठी जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्यावर सरकारी व बचाव पक्षांचा युक्तीवाद संपून शनिवारी (दि.१) निकाल जाहीर केला जाणार होता. मात्र, सकाळच्या सत्रात ॲड. सतीश वाणी व आशुतोष राठोड यांनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका निर्णयाचा दाखला देत शिक्षेच्या स्थगितीला आव्हान देण्यासाठी हरकत अर्ज दाखल केल्याने, न्यायालयात या अर्जांवरच शनिवारी सुनावणी पार पडली. प्रारंभी सकाळच्या सुमारास युक्तीवाद पार पडल्यानंतर, दुपारी ३ वाजता सुनावणी घेण्यात आली. दोन्ही हरकतदारांनी शिक्षेची स्थगिती कायम ठेवावी, अशी जोरदार मागणी केली. मात्र, जिल्हा व सत्र न्यायाधिश नितीन जीवने यांनी स्थगिती देण्याची याचिका फेटाळत याचिकाकर्त्यांना उच्च न्यायालयात हरकत दाखल करण्यासाठी तीन दिवसांची मुदत दिली. तीन दिवसांत तुम्ही उच्च न्यायालयात जा अथवा ५ मार्च रोजी निकाल जाहीर करणार असल्याचे स्पष्ट केले. आता ५ मार्च रोजीच्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष आहे.

> आमदार किंवा मंत्री आहेत म्हणून त्यांच्या शिक्षेला स्थगिती देता येणार नाही. एक मतदार म्हणून त्याविरोधात लढण्याचा आम्हाला पूर्ण अधिकार आहे. न्यायालयाने हरकत अर्ज निकाली काढले असले तरी, उच्च न्यायालयात अर्ज दाखल करण्यासाठी तीन दिवसांची मुदत दिली आहे. त्यानुसार सोमवारी (दि.३) आम्ही उच्च न्यायालयात हरकत अर्ज दाखल करणार आहोत. **-ॲड. सतीश वाणी, हरकतदार**

> न्यायालयात दाखल करण्यात आलेले दोन्ही हरकत अर्ज निकाली काढण्यात आले आहे. न्यायालयाने त्यांना उच्च न्यायालयात अर्ज दाखल करण्यासाठी तीन दिवसांचा अवधी दिला असून, त्यानुसार ते उच्च न्यायालयात जावू शकतात. तसेच ५ मार्च रोजी आता न्यायालय आपला निकाल देणार आहे.
> **- ॲड. अविनाश भिडे, कोकाटे यांचे विधिज्ञ.**

### ...तर आमदारकी जाणार

शिक्षा ठोठावल्यापासून एक महिन्याच्या आत शिक्षेला स्थगिती न मिळविल्यास आमदारकी जाण्याची शक्यता असल्याचे कायदे तज्ज्ञ सांगतात. मंत्री कोकाटे यांच्या शिक्षा स्थगितीबाबत ५ मार्चला सुनावणी होणार असली तरी, उच्च न्यायालयात हरकत दाखल केल्यास, जोपर्यंत हरकतीवर उच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही. तोपर्यंत जिल्हा व सत्र न्यायालय शिक्षा स्थगिती प्रकरणी निर्णय देवू शकणार नाही. त्यामुळे महिनाभरात ही संपूर्ण प्रक्रिया पार पाडली जाणे आवश्यक आहे.

## निधन वार्ता...

### लक्ष्मण भोईर

**पिंपळस रामाचे।** येथील ग्रामपालिका लिपिक लक्ष्मण पांडुरंग भोईर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, भाऊ असा परिवार आहे. अतिशय सुस्वभावी, पिंपळस रामाचे ग्रामपालिकेत दिर्घ काळापासून कामांचा मोठा अनुभव त्यांच्याकडे होता.

### मथुराबाई काठे

**जानोरी |** येथील रहिवासी मथुराबाई राजाराम काठे (७३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, २ मुले, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या समाजसेवक राजाराम काठे यांच्या पत्नी व जानोरीचे माजी उपसरपंच हर्षल काठेयांच्या मातोश्री व माजी सभागृहनेते चंद्रकांत खोडे यांच्या ज्येष्ठ भगिनी होत.

# भटकंतीची आवड असणाऱ्या लेखिका : डॉ. मीना प्रभू



**नाशिक |** पुण्यात जन्म झालेल्या आणि पुण्यात शिक्षण घेतलेल्या लेखिका डॉ. मीना सुधाकर प्रभू वयाच्या ८५ व्या वर्षी गेल्याची बातमी आली. अनेक डॉक्टर लेखकांसारख्या त्या बी. जे. मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थिनी होत्या. शिक्षणाने आणि व्यवसायाने डॉक्टर. परंतु प्रसिद्धी मिळाली साहित्य लेखनातून. लिखाणात देखील प्रवासवर्णन लिहिण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांचे व्याख्यान सार्वजनिक वाचनालय नाशिकमध्ये झाले होते. त्यांची दहा पुस्तके तर पुरंदरे प्रकाशाने प्रसिद्ध केली होती. ही सगळी पुस्तके अत्यंत देखणी आणि वाचनीय आहेत. प्रवासवर्णन म्हटले की, डॉ. मीना प्रभू आठवणार. पतीराज आर्किटेक्ट. त्यांच्या पाठिंब्याने हा प्रचंड प्रवास लेखिकेने केला. मराठीमध्ये विष्णुशास्त्री गोडसे यांचे माझा प्रवास हे पहिले प्रवासवर्णन म्हणता येईल. तेथून प्रवासवर्णनांचा प्रवास सुरू झाला. प्रवास वर्णनात नेहमी पाहिलेला आणि अनुभवलेला इतिहास असतो. त्याला संपूर्णपणे वेगळी दिशा देण्याचे काम डॉ. मीना प्रभू यांनी केले. मराठी साहित्यातील प्रवासवर्णन हा कप्पा समृद्ध करून भटकंतीला खऱ्या अर्थाने अजरामर केले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. डॉ. मीना प्रभू यांना भावपूर्ण श्रद्धांजली. **- ॲड. मिलिंद चिंधडे**

# कॅफेवर आमदारांची धाड; मनपा करणार कारवाई

**नाशिक | प्रतिनिधी**

गंगापूर रोडवरील एका कॅफेवर आमदार देवयानी फरांदे यांनी शनिवारी (दि. १) दुपारी एकच्या सुमारास अचानक छापा टाकत कॅफेत सुरू असलेला गैरकारभार उघडकीस आणला. यावेळी पोलिसांनी पाच ते सहा प्रेमीयुगुलांना ताब्यात घेतले. या कॅफेत तरुण-तरुणींचे अश्लिल चाळे चालत असल्याची माहिती समोर आली होती. याशिवाय या कॅफेविषयी अनेक तक्रारी आल्यानंतर आ. फरांदे यांनी थेट छापा टाकत पोलिसांना कारवाई करण्याच्या सूचना केल्या आहेत.

सरकारवाडा आणि गंगापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विद्या विकास सर्कलजवळ एक कॅफे गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. या कॅफेमध्ये पडदे लावून अनेक कंपार्टमेंट करण्यात आले असून अवघ्या शंभर, दोनशे रुपयांत या कपार्टमेंटमध्ये तरुण-तरुणींना काही तासांसाठी 'एकांतवासी रुम' उपलब्ध करून दिले जात होते. संपूर्ण अंधार असलेल्या या रूममध्ये अश्लिल प्रकार चालत असल्याची माहिती फरांदे यांना मिळाली होती. त्यानुसार आ. फरांदे यांनी कॅफेवर धाड टाकली. यावेळी कॅफेमध्ये तरुण-तरुणी अश्लिल चाळे करीत असल्याचे निर्दशनास आले. यानंतर घटनास्थळी सरकारवाडा पोलीस दाखल झाले. त्यांनी पाच ते सहा प्रेमीयुगुलांना ताब्यात घेत, त्यांची चौकशी केली. तसेच त्यांच्या पालकांना पाचारण करून त्यांचे समुपदेशन करण्यात आले.

> शहरातील कॅफेंवर छापा मोहीम सुरू केली होती. परंतु आता ही कारवाई थंडावल्याने, शहरातील बहुतांश भागात अशाप्रकारचे कॅफे सुरु आहेत. त्यामुळे पोलिसांकडून कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शहरात सर्रासपणे अश्लिल कृत्यासाठी चालविल्या जात असलेल्या बहुतांश कॅफे चालकांनी अनधिकृतपणे बांधकामे केली आहेत. या बांधकामांची माहिती महापालिका प्रशासनाला दिली आहे. महापालिकेने तत्काळ कारवाई करून अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्याची मागणी जोर धरु लागली आहे.

> कॅफेत महाविद्यालयीन व अन्य जोडप्यांना भाड्याने जागा उपलब्ध करून दिली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर याठिकाणी धाड टाकली. यावेळी वाईट गोष्टी आढळून आल्या. पोलिसांनी तत्काळ कारवाई करावी.
> **-आ. प्रा. देवयानी फरांदे**


# क्लासिफाईड /सुपरमार्केट

## पाहिजेत

**ऑफिस** कामाकरिता महिला अकौटंट पाहिजेत - क्वॉलीफिकेशन B.Com/ M.Com स्कील, एम.एस. ऑफिस अकौटंट व टायपिंग येणे आवश्यक. 8779774785. (05/03-CM-342)

## खरेदी/विक्री

**बोरगड,** नाशिक १५३ वार जागेत 4BHK कॉर्नर रो-बंगलो त्वरीत विकणे आहे. संपर्क : 9561049461. (03/03-CM-335)

---

**पाथर्डी** पांडवलेणी ग्रीन व्हॅली पोद्दार स्कूलजवळ नवीन मधले आणि कॉर्नरचे रो-हाऊस स्वस्तात विकणे. संपर्क 9822843831 (10/03-BK-104439)

## दारुबंदीचा गुरुमंत्र

**द ग्रेट** साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00555)

## व्यसनमुक्ती

**गॅरंटीने** सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www.drpalvenashamuktikendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26) (CRINV-23-24JL CRG00554)

## सर्व आजारांसाठी

**जुनाट** सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/ चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/26) (CRINV-23-24JL/CRG00556)

## नावात बदल

**My** old name NAMITA MANOJ VASWANI has been changed to my new name NAMEETA MANOJ VASWANI as per Aadhar No. 4405 1084 2647. (CM-345)

- जाहिरात दर -
◆ क्लासिफाईड डिस्प्ले रु. ६६/- प्रति स्क्वेअर सेमीसेंटर (कॉलम साईज ३.३ सें.मी.) ◆ ४० शब्दापर्यंतच्या छोट्या जाहिराती रु. १५/- प्रतिशब्द ◆ ३+१ फ्री ◆ क्लासिफाईड डिस्प्ले ३+१ फ्री ◆ कमीत कमी शब्दमर्यादा १० शब्द ◆ हायलाईट बॉक्स रु. १५०/- मात्र (प्रति दिवस) ◆ पोस्ट बॉक्स रु. ३००/- मात्र.

### वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.

**या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.**

◆ **जाहिरात विभाग,** दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆**नाशिकरोड :** प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६ ◆**निफाड :** मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११०० ◆**दिंडोरी :** दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८ ◆**मालेगांव :** पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळयाजवळ. ०२५५४-२४३४६२२ ◆**सिन्नर :** दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.


# क्रेडाई नाशिक मेट्रो, प्रोफेशनल रियल्टर्स असोसिएशनचा सामंजस्य करार

**नाशिक |** नाशिकच्या रिअल इस्टेट क्षेत्राला अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने क्रेडाई नाशिक मेट्रो आणि प्रोफेशनल रियल्टर्स असोसिएशन ऑफ नाशिक (प्राण) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या सहकार्याचा उद्देश दोन्ही संघटनांमध्ये सशक्त व्यावसायिक संबंध प्रस्थापित करणे आणि शास्त्रीय पद्धतीने व्यवसायवृद्धिंगत करणे तसेच रिअल इस्टेट क्षेत्रातील तज्ञांच्या मार्गदर्शना द्वारे ज्ञानवृद्धी करणे आहे.

कराराच्या माध्यमातून क्रेडाई आणि प्राण सदस्यांसाठी व्यावसायिक वाढीच्या संधी निर्माण केल्या जातील. क्रेडाई नाशिक मेट्रो अध्यक्ष कृणाल पाटील आणि प्राण अध्यक्ष विक्रांत आव्हाड यांनी या सहकार्याचे महत्त्व स्पष्ट करताना चॅनेल पार्टनर मॉडेलद्वारे विक्री वाढवण्यावर भर दिला. क्रेडाई सचिव गौरव ठक्कर आणि प्राण सचिव नितीन कोटकर यांनी नाशिकच्या रिअल इस्टेट क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित काम करण्याच्या संकल्पनेवर भर दिला. स्वागत सहसचिव नरेंद्र कुलकर्णी यांनी केले. याप्रसंगी क्रेडाई नाशिक मेट्रोचे सहसचिव अनिल आहेर, सचिन बागड ऋषिकेश कोते, खजिनदार हितेश पोतदार तसेच क्रेडाई मुख्य कार्यकारी मंडळाचे सदस्य मनोज खिवसरा, अंजन भालोदिया, श्रेणिक सुराणा, हंसराज देशमुख, शाम साबळे, निशित अटल, सागर शहा, अनंत ठाकरे, विजय चव्हाणके, सुशील बागड, निरंजन शहा, सुशांत गांगुर्डे उपस्थित होते. प्राणतर्फे खजिनदार कैलास कदम, उपाध्यक्ष प्रदीप रणधीर , सहसचिव राज तलरेजा, सल्लागर राजेंद्र कोतकर, डी.जे धामणे तसेच प्राण समिती सदस्य अमित वाघ, यश शाह, संजय दुसे, श्रीकांत पाटेकर, क्षितिज दंडगवल, निलेश येवले, पवन राठी, श्रीरंग भदाणे, जगदीश बंग, गिरीश विजन, योगेश नेरकर, रवी सूर्यवंशी उपस्थित होते.

# किम्स मानवता हॉस्पिटलमध्ये बालकांच्या हृदय शस्त्रक्रिया यशस्वी

नाशिक | किम्स मानवता हॉस्पिटल, नाशिक येथे जन्मजात हृदयाच्या आजाराने ग्रस्त असलेल्या पाच बालकांच्या यशस्वी हृदय शस्त्रक्रिया पार पडल्या. हे सर्व बालक आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील असून, काही सामाजिक संस्था व स्वयंसेवी संघटनांच्या सहकार्याने आणि आर्थिक मदतीने त्यांना हृदयविकारावर आवश्यक उपचार करण्यात आले. या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया सुप्रसिद्ध बालहृदयरोग तज्ञ व विभाग प्रमुख डॉ. ललित लावणकर यांच्या नेतृत्वाखाली आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. राज नगरकर व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. निलेश सिंग, किम्स मानवता हॉस्पिटल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या.

किम्स मानवता हॉस्पिटल मध्ये स्वतंत्र लहान मुलांचा हृदय विकार विभाग असून, या विभागामध्ये हृदय विकार शस्त्रक्रिया तज्ज्ञ, नवजात शिशु व बालरोग तज्ञ, लहान मुलांचे अतिदक्षता विभागातील तज्ञ, चोवीस तास उपलब्ध आहेत. लहान बाळांची काळजी घेणारे प्रशिक्षित डॉक्टर, नर्सिंग आणि पॅरामेडिकल स्टाफच्या मदतीने अशा अत्याधुनिक तंत्राचा अवलंबकरून अनेक गुंतागुंतीच्या यशस्वी केसेस हाताळण्यात आम्हला यश प्राप्त झाले आहे. गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक वैद्यकीय सेवा समाजातील प्रत्येक स्तरातील नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे आमचे ध्येय आहे. लहान मुलांवर हृदय यासारख्या शस्त्रक्रिया करण्यासाठी आधी मुंबई किंवा पुण्याला जावे लागत होते परंतु आता सगळ्या सुविधा नाशिक मधेच उपलब्ध झाल्याने त्याची आर्थिक बचत होत आहे.किम्स मानवता हॉस्पिटलसाठी हा एक मैलाचा दगड असल्याचे डॉ. राज नगरकर यांनी सांगितले.